आरोग्य सेवक (महिला) गट क या
संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या व
नेमणुका **प्रशासकिय** बदल्या सन २०२३
(पेसा क्षेत्र वगळून उर्वरित तालुक्यांत समतोल साधण्यासाठी)

अहमदनगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था-४/333/२०२३
अहमदनगर दि. २९/०५/२०२३

वाचाः- १.शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडिल निर्णय क्र जिपब-४१४ /प्र क्र ११२/आ-१४,दि.१५ मे २०१४.
२.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्र. पत्र क्र जिपब ४१४/ प्र.क्रं.११२/आस्था १४,दिनांक ०२ जुलै २०१४
३.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडिल पुरक पत्र क्र जिपब-८१७/ प्र क्र.२२८/आ-१४,दि.०७ मार्च २०१९
४.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,यांचेकडील पत्र क्रं.संकीर्ण २०२२/प्रक्र२२६/ आस्था-१४, दि. ११ मे २०२२
५.जिल्हा परिषद सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि.**१२/०५/२०२३**

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार, संदर्भ क्र.२ व ३ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, तसेच संदर्भ क्रमांक ४ च्या शासन पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्य विभागाच्या अधिनिस्त कार्यरत असलेल्या आरोग्य सेवक (महिला) गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष समुदेशनाने त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ३ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणापासुन रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी विनंती बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

पेसा क्षेत्र वगळता उर्वरित तालुक्यांत समतोल साधण्यासाठी केलेल्या प्रशासकीय बदल्या

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	बदलीपूर्वीचे ठिकाण			बदली नंतरचे ठिकाण			बदलीचा प्रकार
		उपकेंद्र	प्राआकेंद्र	तालुका	उपकेंद्र	प्राआकेंद्र	तालुका	
१	२	३			४			५
१	कविता रामकिसन महाजन	जवखेडे खालसा	मिरी	पाथर्डी	मढी बद्रुक	पोहेगांव	कोपरगांव	प्रशासकीय

वरिल कर्मचा-यांचे बदलीचे आदेश खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

१) आदेशात नमुद कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी **दि.३१/०५/२०२३** रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.
२) संदर्भ क्रमांक १ मधील प्रकरण-१ मुददा क्र.७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन **दिनांक ०१/०६/२०२३** नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजु न झाल्यास, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणुन गणला जाईल. तसेच मुददा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकिय बाब असल्याने कोणत्याही

Scanned with OKEN Scanner

कर्मचाऱ्यांने राजकिय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक)नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) संबंधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.

४) सदर बदली प्रशासकीय कारणास्तव केलेली असल्याने संबंधितांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक ~~२०२२०५~~ 202305291001162 असा आहे.

स्वाक्षरीत xxxx
(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीम. कविता रामकिसन महाजन,आरोग्य सेवक (महिला),प्राआकेंद्र मिरी,ता.पाथर्डी,जि.अहमदनगर
द्वारा व प्रत - वैदयकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र मिरी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन **दि. ०१/०६/२०२३** नंतर अदा करु नये, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस हजर करुन घेण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतः- गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी / कोपरगांव
प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती पाथर्डी / कोपरगांव
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर
प्रत – जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर
प्रत - वैदयकीय अधिकारी,प्राआकेंद्र पोहेगांव,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर
प्रत – निवडनस्ती

स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.जि.प.अ.नगर यांची स्वाक्षरी असे

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर करिता

Scanned with OKEN Scanner